:: फौजदारी किरकोळ चौकशी अर्ज क्र.२७२/२०२२ मधील
आदेश निशाणी क्र.१ ::
CNR No. MHRA07-001427-2022
(वासंती मंगेश वाघमारे विरुध्द ग्रुप ग्रामपंचायत दामत–भडवळ)

१. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज जन्म, मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अंतर्गत त्यांच्या स्वतःच्या जन्माची नोंद, जन्म नोंदणी नोंदवहीला घेण्यासाठी प्रतिपक्ष यांना आदेश देण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे अर्जातील कथन असे आहे की, ती मौजे भडवळ, ता.कर्जत, जि.रायगड येथील राहिवाशी आहे. अर्जदाराचा जन्म दिनांक १९.१२.१९८४ रोजी मौजे भडवळ, ता.कर्जत, जि.रायगड येथे झालेला आहे. तथापि, नजचुकीने व अज्ञानामुळे अर्जदारच्या जन्माची नोंद प्रतिपक्ष यांच्या कार्यालयातील जन्म नोंदणी नोंदवहीला मुदतीत घेऊ शकला नाही. अर्जदाराला तिच्या जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तिच्या जन्माची नोंद संबंधीत नोंदवहीला घेण्याबाबत योग्य तो आदेश प्रतिपक्षाला देण्यात यावा, अशी विनंती अर्जदाराने प्रस्तुत अर्जाद्वारे केली आहे.

३. सदरचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्जदाराच्या मागणीबाबत 'दैनिक जनखुलासा' मध्ये दिनांक १०.११.२०२२ रोजी जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आले. परंतु, सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द होऊन देखील अर्जदाराच्या जन्म तारखेची नोंद संबंधीत नोंदवहीला घेवून त्याच्या नावाने जन्म नोंदणी प्रमाणपत्र देवू नये असा कोणताही आक्षेप प्राप्त झालेला नाही.

४. सदरचा अर्जाच्या निकालासाठी खालील मुददे निर्माण झाले. त्यावर मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसहीत पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदाराने हे सिध्द केले काय की, तिच्या जन्म तारखेची नोंद प्रतिपक्षाच्या कार्यालयातील संबंधीत नोंदणी नोंदवहीला घेण्यात येऊन तसे जन्म प्रमाणपत्र मिळण्यास तो पात्र आहे ? | होय. |

| | | |
|---|---|---|
| २. | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## :: कारणमिमांसा ::

५. सदरहू अर्जाच्या समर्थनार्थ अर्जदाराने निशाणी क्र.०९ द्वारे साक्षीपुरावा दाखल केला. तसेच अर्जाच्या समर्थनार्थ ग्रुप ग्रामपंचायत, दामत–भडवळ यांच्या अभिलेखामध्ये अर्जदाराच्या जन्म नोंद नसल्याबाबत प्रमाणपत्र(नि.क्र.१२) आणि अर्जदाराचे रेशनकार्डची प्रमाणित प्रत(नि.क्र.१३), अर्जदाराचा रहिवाशी दाखला(नि.क्र.१४) दाखल केले असून निशाणी क्र.१५ वर पुरावा बंद केल्याची पुरसीस दाखल केली आहे. प्रतिपक्षाच्यावतीने कोणताही मौखिक अथवा कागदोपत्री साक्षीपुरावा देण्यात आलेला नाही. अर्जदाराच्या विधीज्ञांचा तोंडी युक्तीवाद ऐकण्यात आला.

**मुददा क्र.१ बाबतः–**

६. प्रस्तुत अर्जाचे व अभिलेखावर दाखल असलेले कागदपत्रांचे अवलोकन केले असता, तसेच अर्जदाराने दाखल केलेला साक्षीपुरावा विचारात घेता असे दिसून येते की, अर्जदार ही भडवळ, पो. आंबिवली, ता.कर्जत, जि.रायगड येथील रहिवाशी असून तिचा जन्म दिनांक १९.१२.१९८४ रोजी भडवळ, ता.कर्जत, जि.रायगड येथे झालेला आहे. परंतु, सदर जन्माची नोंद संबंधीत कार्यालयात नियमाप्रमाणे अर्जदाराचा जन्म झाल्यापासून एक वर्षाच्या आत घेण्यात आली नाही. तसेच सदर प्रकरणात जाहीर प्रगटन नि.क्र.११ दि.१०.११.२०२२ रोजी दैनिक जनखुलासा या वर्तमानपत्रातून काढण्यात आले. परंतु, अर्जदाराच्या जन्माची नोंद संबंधीत कार्यालयात घेण्यात येऊन तसे प्रमाणपत्र देण्यात येऊ नये म्हणून कोणीही हरकत घेतलेली नाही. त्याचप्रमाणे प्रतिपक्षाने अर्जदाराची उलट तपासणी न घेतल्यामुळे त्याचा पुरावा अबाधीत राहिला आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, अर्जदाराचा जन्म दिनांक १९.१२.१९८४ रोजी झालेला असल्यामुळे सदर जन्माची नोंद संबंधीत कार्यालयात होऊन तसे जन्म प्रमाणपत्र मिळविण्यास अर्जदार पात्र आहे. सबब, मी माझा निष्कर्ष मुददा क्र.१ साठी होकारार्थी नोंदवित

आहे व पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## :: आदेश ::

**०१.** अर्ज मंजूर करण्यात येतो.

**०२.** ग्रुप ग्रामपंचायत, दामत–भडवळ, ता.कर्जत, जि.रायगड यांना आदेशीत करण्यात येते की, अर्जदार नामे **वासंती मंगेश वाघमारे** यांच्याकडून योग्य ती फीस भरुन घेऊन त्यांचा जन्म दिनांक **१९.१२.१९८४** रोजी झाल्याबाबतची नोंद त्यांच्या कार्यालयातील जन्म नोंदणी नोंदवहीला घेण्यात यावी.

०३. ग्रुप ग्रामपंचायत, दामत–भडवळ, ता.कर्जत, जि.रायगड यांना असेही निर्देशीत करण्यात येते की, अर्जदाराने योग्य ती फीस भरल्याच्या १५ दिवसांच्या आत त्यांनी जन्म, मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ चे कलम १३(३) अंतर्गत अर्जदाराच्या जन्माची नोंदणी झाल्याबाबतचे प्रमाणपत्र निर्गमीत करावे.

०४. हा आदेश खुल्या न्यायालयात अधिघोषित करण्यात आला.

दिनांक ०६.०१.२०२३

**(सौ. सुजाता रा. शिंदे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
कर्जत, जि.रायगड.